| MHPU240004372006 | **रे. मु. नं. ११०/२००६** |
|---|---|
| | **शिवाजी गायकवाड व इतर** |
| | विरुद्ध |
| | **दत्तात्रय गायकवाड व इतर** |

## निशाणी क्र.१६२ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज ति—हाईत इसम नामे दत्तात्रय अरविंद गायकवाड यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १ नियम १०(२) सह आदेश ६ नियम १७ प्रमाणे त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** त्यावर दोन्ही बाजुंतर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला. वादींतर्फे सदर अर्जास हरकत नसल्याचे नमुद करण्यात आले असुन प्रतिवादी क्र.१८(अ), ४७(अ)(१) ते (४) तर्फे देखील सदर अर्जास हरकत नसल्याबाबत म्हणणे देण्यात आले. इतर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणण्याविना चालविण्यात आला.

**०३.** युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता वादीने दावा मिळकतीचे वाटप होवून मिळण्याकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. ति—हाईत इसम म्हणून दत्तात्रय अर्जुन गायकवाड यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन त्यांना शंकर भिमाजी गायकवाड तर्फे वारस म्हणून सामील करण्याबाबत विनंती केलेली आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी निशाणी क्रमांक १६८ अन्वये दुरुस्त अर्ज दाखल करुन शंकर भिमाजी गायकवाड यांना वारस नसल्याबाबत व प्रतिवादी क्रमांक १ दत्तात्रय अर्जुन गायकवाड यांनी त्यांचे सर्व धार्मिक विधी केले असल्याबाबत दुरुस्ती करुन मागितलेली आहे. सदरचा अर्ज मंजूर झालेला आहे. तसेच दत्तात्रय अर्जुन गायकवाड हे प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन त्यांना दाव्याकामी प्रतिवादी क्र.६७

म्हणून सामील करण्याची विनंती केलेली आहे. परंतु दत्तात्रय अर्जुन गायकवाड हे दाव्याकामी यापूर्वीच प्रतिवादी क्र.१ म्हणून सामील असल्याने त्यांना पुन्हा प्रतिवादी क्र.६७ म्हणून सामील करता येणार नाही. त्यामुळे याबाबत कायदेशीर बाब पाहता दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १ नियमक्रम १०(२) प्रमाणे ते आवश्यक पक्षकार आहेत व ते यापूर्वीच प्रतिवादी क्र.१ दाव्यामध्ये सामील आहेत. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. सदरचा अर्ज निशाणी क्र.१६२ नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाबद्दल आदेश नाही.

स्वाक्षरी/—
**(श्रीमती एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
घोडेगांव, जि. पुणे.

दि.१०/१०/२०२४
स्थळ : घोडेगांव